महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक : ४८२ (५३)/ ४५६०/ पंधरा-अ** **जाहिरात क्रमांक : ०६/२०१६**

**आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ ( Director of Health Services, Maharashtra Medical & Health Services, Group-A)** या पदाच्या **एका** जागेच्या भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. एकूण पदे :- १**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| **अ) महिला (३०%)** | - | - | - | - | -- | - | - | - | - | - | - |
| **ब) खेळाडू (५%)** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **क) अपंग (३%)** | ---- | | | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होऊ शकतो.

**२.२** शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अपंग २००४/५५/समन्वय २, दि. २७ फेब्रुवारी, २००९ व शासन पत्र सार्वजनिक आरोग्य विभाग पत्र क्रमांक नामनि-१२११/प्र.क्र.३७९/सेवा-२, दिनांक १० जानेवारी, २०१२ नुसार प्रस्तुत पदासाठी **विकलांग उमेदवार पात्र नाहीत**.

**३. वेतनश्रेणी:**- रु. ३७,४०० - रु. ६७,००० + ग्रेड पे रु. ८,९००/-

**४. पात्रता:**- उमेदवार भारतीय नागरिक असावा.

४.१ **वय :- दिनांक १ जून, २०१६ रोजी (सर्व उमेदवारांकरीता) ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.**

४.२ महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

४.३ शासन आदेशानुसार माजी सैनिक इत्यादींसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**४.४ शैक्षणिक अर्हता :-**

**Candidate must possess :**

४.४.१ Possess the **M.B.B.S**. Degree of a statutory University or any other qualification specified in the First or Second Schedule of the Indian Medical Council Act. 1956;

४.४.२ Possess a **post-graduate degree in any of the clinical subjects or in Preventive and Social Medicine** as specified in the First or Second Schedule to the Indian Medical Council Act. 1956 or any other qualification recognized as equivalent by the Medical Council of India;

४.४.३ Possess experience of Health Administration, Medical Relief or Family Planning in Government, Zilla Parishad or a Local Body of not less than **ten years** after acquiring post-graduate qualification mentioned in 4.4.2

४.४.४ Provided that in the case of candidates possessing a post graduate degree in any clinical subject, those possessing a Diploma in Public Health or equivalent in addition, will be given preference.

४.५ Selected candidate will have to sign an agreement embodying the conditions of his service including the condition to serve Government for a period of **5 years** or to penalty of **Rs.500/-** or such other sum as may be prescribed by Govt.

४.६ Selected candidate will have to get himself / herself registered under Maharashtra Medical Council Act 1965, before joining of his / her name should be borne in Indian Medical Council Register.

४.७ Selected candidates will be debarred from doing any private practice but will be paid compensatory allowance in lieu according to the rules.

४.८ Period of probation **two years**

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादी अर्हता व अनुभव किमान असून, किमान अर्हता व अनुभव धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने

जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे किंवा अन्य योग्य निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदा-या :-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर करण्यात येईल.

**८. शुल्क :- सर्व उमेदवार - रु. ५२३/-**

**९. ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व पात्रतेच्या निकषांमध्ये सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला आहे. अशा उमेदवारांची सर्वसाधारण (अमागास) वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येत नाही. त्यामुळे मागासवर्गीय उमेदवार वयोमर्यादेत बसत असल्यासच सदर पदाकरीता अर्ज करु शकतील.**

**१०. अर्ज करण्याची पध्दत –**

१०.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

१०.२ पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.inया वेबसाईटद्वारे **दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ ते दिनांक ८ मार्च, २०१६** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

१०.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१०.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१०.५ आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-
(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र /सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

१०.६ www.mahaonline.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

१०.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील “ माझे खाते ” या लिंक वर क्लिक करावे.

(२) “माझे खाते ” या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह असेल. ज्या पदासमोर ‘ Unpaid ’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay Now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) “Pay Now” या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**११. आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**

**१२. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१३. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ८ मार्च, २०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१४. चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ९ मार्च, २०१६ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई** **राजन बा. खोत**
**दिनांक :- १७ फेब्रुवारी, २०१६** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**